महाराष्ट्र शासन
# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४०० ००१.
www.dvet.gov.in desk७@dvet.gov.in ०२२-२२६२०६०४/२९३

**प्रवेशसत्र २०२१/ अतिमहत्त्वाचे**

पत्र क्र. ०७/प्रवेश/२०२१/ १८३
दिनांक १७.०५.२०२१

प्रति,
सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपुर

विषय: प्रवेशसत्र २०२१ मध्ये प्रवेशासाठी औ. प्र. संस्थानिहाय उपलब्ध तुकड्यांची यादी (ITI Directory २०२१) तपासुन अंतिम करणेबाबत...

संदर्भ: उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-३३१५/प्र.क्र.१७/व्यशि-३, दिनांक १४ मे, २०१५

१. संदर्भीय शासन निर्णयानुसार राज्यातील शासकीय व खाजगी औ.प्र. संस्थांतील प्रवेश हे केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने करण्याचे निर्देशित आहेत. सदर शासन निर्णयान्वये प्रवेश नियमावली, पध्दती व मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.
२. प्रवेशसत्र २०२१ चे प्रवेश हे केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने माहे जुन २०२१ पासुन सुरू करण्याचे नियोजित आहे. सदर प्रवेश सत्रात औ.प्र. संस्थानिहाय प्रवेशासाठी उपलब्ध तुकड्या व जागा निश्चित करुन त्या ITI Directory - २०२१ च्या स्वरुपात प्रकाशित करणे क्रमप्राप्त आहे. संचालनालयाकडे उपलब्ध माहितीच्या आधारे ITI Directory - २०२१ तयार करण्यात आली असुन ती PDF व Excel स्वरुपात या पत्रासोबत आपणास ई-मेल व्दारे उपलब्ध करुन देण्यात येत आहे. प्रादेशिक कार्यालय निहाय ITI Directory - २०२१ संचालनालयाच्या प्रवेश संकेत स्थळ https://admission.dvet.gov.in वर Download सदराखाली देखिल उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
३. सर्व शासकीय व खाजगी औ. प्र. संस्थांनी त्यांच्याकडे प्रवेशसत्र २०२१ मध्ये प्रवेशासाठी उपलब्ध व्यवसाय तुकड्या, तुकड्यांचा प्रकार, संपर्क तपशिल, इत्यादी माहिती काळजीपूर्वक तपासावी. सदर माहितीमध्ये कोणताही बदल असल्यास ITI Directory - २०२१ च्या Printout मध्ये आवश्यक तेथे निळ्या शाईने तसे नमुद करावे. Excel Sheet मध्ये देखिल तसाच बदल करावा. सदर माहिती प्रमाणित करुन सर्व औ.प्र. संस्थांनी दि. २५.०५.२०२१ पर्यंत संबंधीत प्रादेशिक कार्यालयास ई-मेलव्दारे सादर करावी.
४. प्रादेशिक कार्यालयांनी औ.प्र. संस्थानिहाय माहिती संबंधीत औ.प्र. संस्थांकडुन दि. २५.०५.२०२१ पर्यंत तपासुन व प्रमाणित करुन घ्यावी. प्रादेशिक कार्यालयनिहाय एकत्रित व प्रमाणित माहित Excel स्वरुपात संचालनालयास desk७@dvet.gov.in या ई-मेलवर दि.२७.०५.२०२१ पर्यंत सादर करावी.

५. प्रादेशिक कार्यालयाने प्रवेशासंबंधी विविध स्तरावर समन्वयक नेमुन त्यांच्या तपशिल ITI Admission Coordination Committee - २०२१ या Excel स्वरुपात संचालनालयास desk७@dvet.gov.in या ई-मेलवर दि.२७.०५.२०२१ पर्यंत सादर करावा.
६. संचालनालय स्तरावर प्रादेशिक कार्यालयांकडुन प्राप्त माहिती संकलीत करुन तपासण्यात येईल व त्यानुसार ITI Directory - २०२१ अंतिम करुन प्रवेश संकेतस्थळ https://admission.dvet.gov.in वर प्रकाशित करण्यात येईल.

प्रवेशप्रक्रिया प्रभाविपणे राबविण्यासाठी ITI Directory - २०२१ अचूक असणे अनिवार्य आहे. तरी औ.प्र. संस्था व प्रादेशिक कार्यालयांनी सदर कार्यवाही अत्यंत काळजीपूर्वक व विहित कालावधीत पार पाडावी. प्रादेशिक कार्यालयांना सदर कार्यवाही पूर्ण करण्यासाठी कोणत्याही प्रकारची अडचण उद्भवल्यास त्यांनी श्रीमती ज्योती लोहार, कार्यासन अधिकारी (८८७९९१७७६८) वा श्री. आशिष आखाडे, प्रवेश समन्वयक (८१६९६ ८४७३३) यांच्याशी संपर्क करावा.

(दि. अं. दळवी)
संचालक

प्रत:
१. सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांना प्रादेशिक कार्यालयांमार्फत
२. सर्व शासकीय व खाजगी औ. प्र. संस्थां यांना प्रादेशिक कार्यालयांमार्फत